# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## आरोग्य विभाग (मुख्यालय )

## जाहिर सुचना क्र. २५ /२०२२-२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग कार्यालयाकडून खाली नमुद केले कामासाठी जाहिर निविदा www.smkc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | फॉर्म फि र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती निदान केंद्राकरीता एक्स रे मशिनच्या देखभाल व दुरूस्तीकामी एजन्सी नियुक्ती (सन २०२३-२४ सालाकरीता) | रु.८५,०००/- | रु.८५०/- | ३१ मार्च २०२४ | रु.२५०/- |

१. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग सांगली.

२. संपुर्ण निविदा प्रक्रिया म्हणजे अर्ज विक्री, सादरीकरण व स्विकृती मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग सांगली व्दारे कार्यरत राहील.

३. निविदा संचाची विक्री महानगरपालिकेच्या मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग सांगली येथे दि.०८/०३/२०२३ पासून दि.१६/०३/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध केली जातील व दि.१६/०३/२०२३ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

४. निविदा दि.१७/०३/२०२३ रोजी सायं. ०४.०० वा. निविदा कमिटी समोर उघडण्यात येतील.

५. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग सांगली येथे संपर्क साधावा.

६. या निविदा बाबतच्या शर्ती अटी मध्यवर्ती निदान केंद्र, आरोग्य विभाग सांगली येथे उपलब्ध आहेत.

७. कोणतेही एक टेंडर स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता सर्व टेंडर नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

Sd/-
वैद्य.आरोग्याधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली
दि.:-०८/०३/२०२३

# निविदा शर्ती व अटी

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती निदान केंद्राकरीता एक्स-रे मशिनच्या देखभाल व दुरुस्तीकामी दर निश्चितीसाठी जाहीर निविदा सुचना क्रमांक २५/२०२२-२३ करीता शर्ती व अटी.

---

१) निविदा दोन लिफाफा पध्दतीने द्याव्यात.

अ) लिफाफा नं. १ यामध्ये खालील तांत्रिक कागदपत्रे आवश्यक आहेत.

१- बयाणा रक्कम भरल्याचे ~~ऑनलाईन~~ चलन

२- विहीत मुदत असलेले एक्स-रे मशिन दुरुस्तीचे अधिकृत लायसन्स असावे.

३- GST नोंदणी प्रमाणपत्र.

४- शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था / वैद्यकीय ट्रस्ट व अनुदानित संस्था यांना एक्स-रे मशिन देखभाल व दुरुस्ती केल्याचा अनुभवाचा दाखला.

५- विहीत मुदत असलेले मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये नमुना (ड) संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

६- टेंडर शर्ती व अटी मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेला फॉर्म जोडणे आवश्यक आहे.

ब) लिफाफा नं. २ यामध्ये फक्त निविदा दर ~~BOQ~~ टक्केवारी मध्ये देणेचा आहे.

२) लिफाफा नं. १ प्रथम उघडण्यात येईल त्यामध्ये किमान ३ पात्र पुरवठादार असतील तरच लिफाफा नं. २ (टेंडर दर) उघडणेत येईल.

३) I.निवीदाधारकाचे EPF कायदयानुसार नोंदणी प्रमाणपत्र व तद् अनुशंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेबाबतची कागदपत्रे निवीदेसोबत जोडणेची आहेत. (लागू असेल तेथे).

II.महाराष्ट्र शासन परिपत्र क्रमांक. GST/प्र.क्र.-८१/कराधान-१ दि.१९ ऑगस्ट २०१७ यामधील नमुद मार्गदर्शक सुचने नुसार GST ची अंमलबजावणी दि.१ जुलै २०१७ पासुन सुरु केलेने GST अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असल्याने त्याबाबत GST च्या कराचा बोजा याचा विचार करुन निवीदादर भरणेचा आहे. तसेच त्या GST बाबत शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार व GST नोंदणी प्रमाणपत्र दि.१९ ऑगस्ट २०१७ चे व त्यापुढे वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही मक्तेदारावर बंधनकारक राहिल.

४) निविदेसोबत निविदाधारकाने एकुण रकमेच्या १ % बयाणा रक्कम ऑनलाईन भरणेची असुन त्याची पावती स्कॅन करुन लिफाफा नं. १ मध्ये जोडणेची आहे. बयाणा रकमेचे चलन न जोडलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

५) मध्यवर्ती निदान केंद्राकरीता एक्स-रे मशिनच्या देखभाल व दुरुस्तीकामी दर सर्व करासह देणेचे आहे.

६) मध्यवर्ती निदान केंद्राकरीता एक्स-रे मशिनच्या देखभाल व दुरुस्ती मागणीनुसार करणेची आहे.

७) ज्यांचे नांवे निविदा मंजुर होईल त्यांनी एकुण मंजुर रकमेच्या ५ % सुरक्षा अनामत रोखिने महानगरपालिकेकडे भरणेची असुन स्वखर्चाने लेखी करारपत्र करुन देणेचे आहे.

८) बयाणा रक्कम बँकेत भरलेचे चलन लिफाफा नं. १ मध्ये जोडले नसलेस सदर निविदेचा विचार केला जाणार नाही.

९) सुरक्षा अनामत भरणे व लेखी करारपत्र यांची समजमध्ये नमुद मुदतीत पुर्तता करणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदा धारकाची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व त्याकामी महानगरपालिकेस पुन्हा कराव्या लागणाऱ्या खटाटोपीसाठी जो प्रत्यक्ष जादा खर्च व नुकसान होईल त्या नुकसानीची जबाबदारी मंजुर निविदा धारकाचे जाती व इस्टेटीवर राहील. तसेच याबाबत मक्तेदाराने टाळाटाळ केलेस व त्यामध्ये महानगरपालिकेची गैरसोय होवुन नुकसान झाल्यास फसवणुकीचा गुन्हा दाखल करणेत येईल.

१०) कोणतीही एक अथवा सर्व निविदा मंजुर करणे अथवा नामंजुर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. त्याबाबत त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

११) करारपत्र करुन दिल्यानंतर महानगरपालिकेने वर्क ऑर्डर दिलेल्या मुदतीत मध्यवर्ती निदान केंद्राकरीता एक्स-रे मशिनची देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहील अन्यथा त्यापुढे प्रत्येक दिवसास रु. १००/- मात्र दंड आकारण्यात येईल. मक्तेदाराने त्यानुसार एक्स-रे मशिनची देखभाल व दुरुस्ती न केलेस महानगरपालिका दोन नंबरच्या मक्तेदारास वर्क ऑर्डर देईल व त्यामध्ये जो जादा खर्च येईल, तो मंजुर मक्तेदाराकडुन वसुल केला जाईल.

१२) निविदा महा-ई टेंण्डरद्वारे ऑनलाईन भरणेची आहेत.

१३) निविदा शर्ती अटीप्रमाणे प्रात्र असणाऱ्या स्थानिक निविदा धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

१४) एक्स-रे मशिनची देखभाल व दुरुस्ती स्पेसिफिकेशनप्रमाणे नसलेस तो स्विकारला जाणार नाही. तसेच एक्स-रे मशिनच्या देखभाल व दुरुस्तीचा दर्जा /गुणवत्ता /स्थिती याबाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा दोष उदभवलयास त्याचे सर्व प्रकारचे निरसन स्वखर्चाने करुन देणेची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१५) वरीलप्रमाणे टेण्डर शर्ती अटी मान्य असलेबाबत निविदा दर शर्ती अटी फॉर्म स्वाक्षरी करुन लिफाफा क्र. १ मध्ये स्कॅन करुन जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

वरीलप्रमाणे शर्ती अटी आम्हास मान्य आहेत.

निविदा धारकाची सही व शिक्का

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका